**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं नवी दिल्ली इथं उद्घाटन

- भारत आणि मेक्सिको या दोन्ही देशात परस्पर संबंध बहुआयामी आणि दृढ होतील, असा केंद्रीय अर्थमंत्र्यांना विश्वास

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग

- बाबा सिद्धीकी हत्या प्रकरणात आतापर्यंत ९ जणांना अटक, एक पोलीस निलंबित

**आणि**

- बंगलोर क्रिकेट कसोटी सामन्यात भारताच्या दुसऱ्या डावात ३ बाद ३४४ धावा /सर्फराझ खानचं पहिलं शतकं

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं नवी दिल्ली इथं उद्घाटन झालं. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिकण्याचा कार्यक्रम पूर्ण करेल. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात वैयक्तिक नागरिक, विविध मंत्रालयातील विभागातील कर्मचारी आणि इतर संघटनांमध्ये काम करणारे कर्मचारी सहभागी होतील. डिजिटल परिसंस्थेच्या मदतीनं नागरिकांच्या हितासाठी प्रशासकीय यंत्रणा तयार व्हावी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं सप्टेंबर २०२० मध्ये

कर्मयोगी अभियान सुरू करण्यात आलं. नागरी सेवा देणाऱ्यांसाठी क्षमता निर्मिती आणि मानव संसाधन व्यवस्थापनासाठी विकास साधण्याचा हा कार्यक्रम आहे.

**<><><><><>**

भारत आणि मेक्सिको या दोन्ही देशात परस्पर संबध बहुआयामी आणि दृढ होतील, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. मेक्सिको इथं होत असलेल्या भारत-मेक्सिको व्यापार आणि गुंतवणूक सहकार्य वाढवण्यासाठी आयोजित ‘भारत-मेक्सिको व्यापार आणि गुंतवणूक शिखर परिषदेत’ त्या बोलत होत्या. मेक्सिको सिटीचे आर्थिक विकास मंत्री मानोला अलदामा हे देखील या परिषदेत सहभागी झाले होते. भारत देशात औषध निर्मिती, उत्पादन, आणि वाहन क्षेत्रात वाढ होत असून यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी मुबलक संधी आहेत, असं अर्थमंत्री यावेळी म्हणाल्या. डिजिटल क्षेत्रात भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सक्षम असून दोन्ही देशांमध्ये आर्थिक सहकार्य वाढवण्याच्या अनेक वाटा खुल्या आहेत, असं सीतारामन यांनी यावेळी अधोरेखित केलं. भारत-मेक्सिको मधली भागीदारी, सीमापार सहकार्य आणि फिनटेक-डिजिटल देय-प्रणाली मधल्या नाविन्यपूर्ण कामांसाठी परस्पर देशांमध्ये व्यापक बाजार संधी आहेत , असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. भारतीय उद्योग महासंघ आणि कॉन्सेजो कोऑर्डिनेटर एम्प्रेसरिअल यांच्यातल्या सामंजस्य कराराचा त्यांनी आढावा घेतला.

दरम्यान, मेक्सिकोचे वित्त मंत्री यांनीही सीतारामन यांची भेट घेतली. त्यावेळी दोन्ही देशातले सामायिक अनुभव, सहकार्य आणि भारतातल्या डिजिटल परिवर्तनावर दोन्ही देशांच्या अर्थमंत्र्यांमध्ये विशेष चर्चा झाली. १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान अर्थमंत्री मेक्सिकोच्या दौऱ्यावर असून यावेळी त्या अनेक महत्त्वाचे मंत्री आणि पदाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आफ्रिकन राष्ट्रातील आपल्या तीन दिवसांच्या दौऱ्याच्या अखेरच्या दिवशी आज मलावीतील सांस्कृतिक स्थळांना भेट देणार आहेत. काल राष्ट्रपतींनी त्यांचे मालावीचे अध्यक्ष लाजरस चकवेरा यांच्याशी द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली. भारत आणि मलावीदरम्यान क्रीडा, युवा, औषधनिर्माण, कला आणि संस्कृती क्षेत्रात सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. भारतानं मलावीला एक हजार मेट्रिक टन तांदूळ आणि कर्करोगावरील उपचार सामग्री तसंच अवयव प्रत्यारोपण केंद्र उभारणीसह इतर वैद्यकीय मदत देण्यास मान्यता दिली. भारताच्या राष्ट्रपतींनी अलगेरिया, मोरिटानिया आणि मालावी या आफ्रिकन देशांना दिलेली ही पहिलीच भेट आहे, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयांनं दिली.

<><><><><>

राष्ट्रीय स्तरावरील रबी कृषी संमेलनाचं उद्घाटन केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं होणार आहे. केंद्रिय कृषीराज्यमंत्री रामनाथ ठाकूर हे ही यावेळी उपस्थित राहतील. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आधारित पद्धतींमध्ये सहकार्य आणि नाविन्याला चालना देणं हा या परिषदेचा उद्देश आहे. तसंच आगामी रब्बी हंगामासाठी कोणते उपक्रम राबवले जाऊ शकतात आणि त्यासाठीच्या धोरणांवर चर्चा करण्यासाठी विविध मंत्रालयं, राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि संघटनांचं प्रतिनिधी एकत्र येतील.

<><><><><>

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीतल्या घटक पक्षांची बैठक नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होत आहे. मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच भाजपा आणि इतर घटक पक्षांचे ज्येष्ठ नेते बैठकीला उपस्थित असून जागा वाटपासंदर्भात बैठकीत चर्चा सुरु आहे.

महाविकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. उद्धव ठाकरे यांच्या तब्बेतीची विचारपूस करण्यासाठी आपण त्यांच्या निवासस्थानी आलो होतो, असं काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

चेन्नीथला म्हणाले, आमच्यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत. आज दुपारी ३ वाजता पुन्हा काँग्रेसकडून नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जयंत पाटील आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय राऊत यांच्या उपस्थितीत बैठक होणार असून यामध्ये जागा वाटपाबद्दल चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत ९ जणांना अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी बाबा सिद्दीकी यांच्या सुरक्षारक्षकाला निलंबित केलं आहे. सुरक्षेसाठी तैनात असतांनाही त्याने कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कॉन्टेबल शाम सोनवणे याला निलंबित करण्यात आलं आहे. हल्लेखोरांनी मिरची पावडरच्या

स्प्रेचा आणि धुराचा वापर केल्यामुळे गोळीबार करता न आल्याचं त्याने आपल्या जबानीत म्हटलं आहे. या हत्याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी बाबा सिद्दीकी यांचा मुलगा आमदार जीशान सिद्दीकी यांनी केली आहे.

**<><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीच्या हालचालींना वेग आला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आज रांची इथं इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांशी चर्चा करतील. राजद नेते तेजस्वी यादवही झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी चर्चा करणार आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटपाचं सूत्र ठरलं असून भाजपा ६८ जागांवर तर इतर मित्र पक्ष उर्वरित जागांवर निवडणूक लढवणार आहेत. पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज कालपासून दाखल होऊ लागले असून मतदान १३ नोव्हेंबर ला आहे.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर सुरु असलेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीत अखेर भारतीय फलंदाजांना सूर गवसला. काल तिसऱ्या दिवशी रोहित शर्मा, विराट कोहली आणि सर्फराझ खान यांनी अर्धशतकं झळकावली आणि दिवसअखेर ३ बाद २३१ धावांचा पल्ला गाठला. आज सकाळी खेळ सुरु झाल्यावर सर्फराज खानने आंतरराष्ट्रीय कसोटीतलं पहिलं शतक झळकावलं तर ऋषभ पंतने ५५ चेंडूत ५० धावा फटकावल्या. भारताची धावसंख्या ३ बाद ३४४ असताना पाऊस पडू लागला आणि उपाहारासाठी खेळ थांबवण्यात आला.

**<><><><>**

मलेशिया इथं होणाऱ्या सुल्तान जोहोर चषक स्पर्धेत भारतीय ज्युनिअर पुरुष हॉकी संघाचा पहिला सामना आज जपानशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी

१ वाजून ३५ मिनिटांपासून हा सामना सुरू होत आहे. भारताची लढत २० ऑक्टोबरला ग्रेट ब्रिटनशी, २२ ऑक्टोबरला मलेशियाशी आणि २३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. सांघिक लढतींतील भारताचा अखेरचा सामना २५ ऑक्टोबरला न्यूझिलंडविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

युगांडा देशामध्ये मंकीपॉक्स या आजारानं बाधित ४९ नव्या रुग्णांची नोंद झाली असून त्यामुळे या संसर्गानं बाधित रुग्णांची एकूण संख्या आता १४५ वर पोहोचली असल्याचं, युगांडाच्या आरोग्य मंत्रालयानं सांगितलं आहे. राजधानी कंपाला मध्ये सर्वाधिक अर्थात २७ रुग्ण असून आत्तापर्यंत या आजारानं एकाही मृत्यूची नोंद झाली नसल्याचं आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. युगांडातल्या १९ जिल्ह्यांमध्ये या आजाराचा सर्वाधिक प्रभाव असून गेल्या आठवड्यात यात मोठी वाढ झाल्याचं आढळलं आहे.

**<><><><><>**

हमासचा नेता याहा सिनवरच्या मृत्यूनंतरही हमास संघटनेचं अस्तित्व टिकून राहील, असं इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांनी सांगितलं आहे. समाजमाध्यमांद्वारे जारी केलेल्या निवेदनात त्यांनी म्हटलं आहे की इस्रायलविरुद्धच्या युद्धात सिनवरच्या मृत्यूमुळे नुकसान झालं आहे, पण त्याच्या मृत्यूनंतरही ही लढाई सुरूच राहील.

**//<><><><><>//**